विठठ्लवाडी वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०५ /२०२६ दि. १६ /०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हददीत उल्हासनगर नं. ५ येथे दि. १८/०९/२०२६ रोजी सिंधी बांधवांचा **'चालिया'** उत्सव साजरा होत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** उल्हासनगर कॅम्प नं. ५, लाल चक्की कडून बाजारपेठ मार्गे दूधनाका बाजूकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लाल चक्की कॉर्नर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	स्दरची वाहने लाल चक्की कॉर्नर येथून श्री नारायण बनवारी मार्गे सेक्शन ३६, ३७ मार्गे टेऊराम रोडने इच्छित स्थळी जातील. तसेच **इतर जड वाहने व एस. टी. बसेस** आय.बी.पी. पेट्रोल पंप समोरील रेशन ऑफिस येथून वळवून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** दूधनाका मेन बाजारपेठ कडून लालचक्की नाका बाजारपेठ कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दूधनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने दूधनाका येथून टेऊराम आश्रम मार्गे किंवा झुलेलाल मार्केट मार्गे भाटीया रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** रेशन ऑफिस रोड कडून जीवनघोट आश्रम रोडने चालिया मंदिर कडे येणाऱ्या वाहनांना **जीवनघोट आश्रम** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने जिवन घोट आश्रम येथुनच आलेल्या मार्गाने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**४)** गांधीरोड तहसिल कार्यालयाकड्न मठमंदिर नाक्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शोभराज गार्डन कॉर्नर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने शोभराज गार्डन कॉर्नर येथुनच आलेल्या मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**५)** मच्छी मार्केट रोडने गल्ली नं. १ व २ मठमंदीर नाक्याकड्न वसंतशहा बाजाराकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मठमंदीर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** सदर वाहने मच्छी मार्केट येथे बॅरिकेट लावलेल्या ठिकाणाहुन आलेल्या मार्गे इच्छित स्थळी जातील.
पर्यायी मार्ग –	**ब)** अंबरनाथ कडे जाणाऱ्या एस. टी बसेस, लॉरी टेम्पो इ. वाहने ही उल्हासनगर कॅम्प नं. ५ नेताजी चौक, कुर्ला कॅम्प रोड, कैलास कॉलनी मार्गे जातील व त्याच मार्गाने परत येतील.
पर्यायी मार्ग –	**क)** वसारगाव, आकाश कॉलनी, गायकवाड पाडा या बाजुने येणारी सर्व वाहने उजवे वळण घेवुन स्वामी शांतीप्रकाश आश्रम येथुन भाटीया चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्कींग –	**दूधनाका ते लाल चक्की रस्त्याचे दोन्ही बाजूस** सर्व प्रकारच्या वाहनांना **'नो पार्कींग'** करण्यात येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि.१८/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वा. ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद

प्रत कार्यवाहीसाठी :—

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — ४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/— म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावून घ्यावीत.